# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:03.07.2024** **वारःबुधवार**

---

1. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभारदर्शक ठराव मंजूर झाल्यानंतर लोकसभेचं कामकाज अनिश्चित काळासाठी संस्थगित
2. तिसऱ्या कार्यकाळात आमचं सरकार तिप्पट ताकदीनं आणि गतीनं काम करेल-पंतप्रधानांची लोकसभेत ग्वाही
3. शेतकरी, कष्टकरी, युवा आणि महिलांच्या कल्याणासाठी सरकार कार्यरत असल्याचं मुख्यमंत्र्यांचं विधानसभेत प्रतिपादन
4. सभागृहात आक्षेपार्ह शब्द वापरल्याप्रकरणी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे पाच दिवसांसाठी निलंबित
5. विधानपरिषदेच्या 11 जागांसाठी 14 उमेदवारांचे 24 अर्ज दाखल; आज छाननी आणि
6. उत्तर प्रदेशात हाथरस जिल्ह्यात सत्संगादरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत 116 भाविकांचा मृत्यू; पुणे-सोलापूर महामार्गावरील अपघातात पाच ठार

**<u>संस्थगित</u>**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनातलं लोकसभेचं कामकाज काल अनिश्चित काळासाठी संस्थगित झालं. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभारदर्शक प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर कामकाज तहकूब केल्याची घोषणा सभापती ओम बिर्ला यांनी केली. हे अधिवेशन 24 जूनला सुरू झालं होतं आणि त्याचं कामकाज आज म्हणजे 3 जुलैपर्यंत निश्चित करण्यात आलं होतं.

**<u>मोदी</u>**

देशातल्या जनतेनं रालोआ सरकारला तिसऱ्यांदा स्पष्ट कौल दिला असून या तिसऱ्या कार्यकाळात आमचं सरकार तिप्पट ताकदीनं आणि गतीनं काम करेल अशी ग्वाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल लोकसभेत दिली. संसदेत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणावरील आभारदर्शक ठरवावर झालेल्या चर्चेला ते उत्तर देत होते. आपल्या भाषणात त्यांनी रालोआ सरकारच्या गेल्या 10 वर्षातल्या कामगिरीचा आढावा घेतला, आणि त्याचवेळी विरोधकांवर जोरदार टीकास्त्र सोडलं. जनतेनं रालोआच्या बाजूनं स्पष्टपणे कौल दिला असूनही त्याबाबत काँग्रेस अपप्रचार करत जनतेची दिशाभूल करत आहे, अशी टीका मोदी यांनी केली. आभारदर्शक ठरावावरील चर्चेदरम्यान सभागृहात काही अनुचित आणि असत्य वक्तव्य झाली असल्याचं सांगत, त्याबाबत कठोर कारवाई करण्याची मागणी मोदी यांनी सभापतींकडे केली. देशाच्या प्रगतीत अडसर निर्माण करण्याचं, जगात देशाची नाचक्की करण्याचं कारस्थान रचलं जात असल्याचा आरोप त्यांनी केला. नीट परीक्षेतल्या घोटाळ्याची गंभीर दखल सरकारनं घेतली असून त्याचा तपास केंद्रीय यंत्रणांमार्फत सुरू आहे, असं ते म्हणाले. दोन तासांपेक्षा जास्त काळ सुरू असलेल्या पंतप्रधानांच्या या संपूर्ण भाषणादरम्यान विरोधकांनी सरकारविरोधात जोरदार घोषणा दिल्या.

**<u>राज्यपाल अभिभाषण-मुख्यमंत्री-विधानसभा</u>**

राज्यातील जनतेचा विचार, विकास आणि विश्वास हीच आमच्या सरकारच्या वाटचालीच्या यशाची त्रिसूत्री असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल सांगितलं. राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावाला त्यांनी काल विधानसभेत उत्तर दिलं. शेतकरी, कष्टकरी, कामगार, महिला, युवा आणि वारकरी यांच्या कल्याणासाठी सरकार कार्यरत असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठीची वयोमर्यादा वाढवून 65 वर्षे करण्यात आली आहे, यासाठीच्या पात्रता अटीतून जमिनीची अट रद्द केल्याचंही मुख्यमंत्र्यांनी यावेळी जाहीर केलं. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील महिलांच्या खात्यात मदतीची रक्कम लगेचच जमा करण्यात येईल, तर, उर्वरित महिलांना अर्ज आणि पडताळणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर जुलै महिन्यापासूनचे पैसे देण्यात येतील असंही ते म्हणाले. मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणात अर्थसंकल्पातील घोषणांची उजळणी केली. या सर्व घोषणांसाठी पुरेशा निधीची तरतूद करण्यात आली असून, यामुळं जनतेला 1 लाख कोटी रुपयांचा लाभ मिळेल, असं ते म्हणाले. राज्य दुष्काळमुक्त करण्यासाठी शासनानं अनेक महत्वाच्या सिंचन प्रकल्पांना गती दिली असल्याचं त्यांनी नमूद केलं. मराठवाड्यात 11 जलसंपदा प्रकल्पांना मान्यता देण्यात आली आहे. परदेशी गुंतवणुकीच्या बाबतीत राज्य आज देशात पहिल्या क्रमांकावर असून, देशात झालेली 30 टक्के परदेशी गुंतवणूक महाराष्ट्रात झाली असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. यानंतर राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभारदर्शक प्रस्ताव आवाजी मतदानानं विधानसभेत मंजूर झाला.

**<u>लाडकी बहीण</u>**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज करण्याची मुदत 31 ऑगस्टपर्यंत वाढवण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आला. या निर्णयाची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल विधानसभेत निवेदनाद्वारे दिली. 20 षटकांच्या विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेतील विश्वविजेत्या भारतीय क्रिकेट संघाचं काल विधानसभेत अभिनंदन करण्यात आलं.

**<u>दानवे निलंबन</u>**

विधान परिषदेत आक्षेपार्ह वक्तव्य केल्याप्रकरणी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांना पाच दिवसांसाठी निलंबन करण्याचा ठराव काल विधान परिषदेत आवाजी मतदानानं मंजूर करण्यात आला. उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी हा ठराव मांडला. यासंदर्भात विरोधकांची बाजू ऐकून घेण्यात यावी, असा आग्रह विरोधी पक्षांनी केला. मात्र दानवे यांनी अत्यंत आक्षेपार्ह, अशोभनीय अपशब्द वापरुन, सभागृहाची प्रतिष्ठा मलीन केली आणि सर्वोच्च सभागृहाचा अवमान केला आहे. त्यांच्या या असभ्य, अशिष्ट वर्तनाकडं दुर्लक्ष केल्यास संसदीय प्रथांचं अवमूल्यन होऊन सभागृहाच्या कामकाजाबाबत चुकीचा पायंडा पडेल असं सांगत, उपसभापती डॉक्टर नीलम गोऱ्हे यांनी दानवे यांना पांच दिवसांसाठी निलंबित करण्यात येत असल्याचं जाहीर केलं.

दरम्यान, हा निर्णय एकांगी आणि अन्यायकारक असल्याची प्रतिक्रिया अंबादास दानवे यांनी व्यक्त केली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी पत्रकारांशी बोलतांना, दानवे यांच्या कथित अवमानकारक वक्तव्याबद्दल आपण माफी मागत असल्याचं सांगितलं. मात्र दानवे यांना आपली बाजू मांडण्याची संधी न देता, सदनानं असा ठराव संमत करणं हे लोकशाहीला घातक असल्याचं ठाकरे यांनी नमूद केलं.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ सुधारणा विधेयकेला काल विधानपरिषदेत मंजुरी देण्यात आली. त्यानंतर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या सर्व प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी तालुका पातळीवर तीन अशासकीय सदस्यांची समिती स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

**<u>दूधभाव-विधानसभा</u>**

आंतरराष्ट्रीय बाजारात दूध भुकटी आणि लोण्याचे दर कमी झाल्यानं राज्यातील दूध उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत आले होते. दूध उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळावा, यासाठी दुधाला प्रतिलिटर 30 रुपये स्थायीभाव आणि शासनाकडून 5 रुपये अनुदान देण्याचा निर्णय शासनानं घेतला आहे असं निवेदन पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी काल विधानसभेत दिलं.

**<u>नाशिक शिक्षक मतदारसंघ</u>**

नाशिक विभाग शिक्षक मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणुकीत शिवसेनेचे किशोर दराडे निवडून आले आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त डॉक्टर प्रवीण गेडाम यांनी काल सकाळी दराडे यांना विजयी घोषित केलं.

**<u>विधान परिषद-मुंबई</u>**

राज्य विधान परिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीचे अर्ज भरण्याच्या कालच्या शेवटच्या दिवसअखेर 11 जागांसाठी 14 उमेदवारांनी 24 अर्ज दाखल केले आहेत. भाजपाच्या पंकजा मुंडे, परिणय फुके, सदाभाऊ खोत, योगेश टिळेकर आणि अमित गोरखे यांनी काल अर्ज भरले. राष्ट्रवादी काँग्रेसकडून राजेश विटेकर आणि शिवाजीराव गर्जे, शिवसेनेकडून माजी खासदार कृपाल तुमाने आणि भावना गवळी यांनी अर्ज भरला. काँग्रेसकडून प्रज्ञा सातव, तसंच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून मिलिंद नार्वेकर यांनीही अर्ज दाखल केला. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं शेकापच्या जयंत पाटील यांना पाठिंबा जाहीर केला आहे. आज या अर्जांची छाननी होणार असून 5 जुलैपर्यंत अर्ज मागे घेता येतील. 12 जुलै रोजी मतदान होऊन त्याच दिवशी संध्याकाळी मतमोजणी होणार आहे.

**<u>आषाढी पालख्या</u>**

आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे निघालेल्या संत श्री ज्ञानेश्वर महाराज आणि संत श्री तुकाराम महाराज यांच्या पालख्या आपल्या पुढील मुक्कामासाठी काल सकाळी मार्गस्थ झाल्या. संत तुकाराम महाराजांची पालखी काल लोणी काळभोर इथं मुक्कामी होती, आज ती ऊरुळी कांचनमार्गे यवतकडे मार्गस्थ होईल. तर, संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी काल दिवे घाटाचा अवघड टप्पा पार करून सासवडच्या मुक्कामी होती. आजही पालखीचा मुक्काम सासवड इथंच असणार आहे.

**<u>लातूर-नीट</u>**

'नीट' प्रश्नपत्रिका फुटी प्रकरणात लातूर इथं अटकेत असलेले आरोपी जलील खान पठाण आणि संजय जाधव यांच्या पोलिस कोठडीत 6 जुलैपर्यंत वाढ करण्यात आली आहे. या दोन्ही आरोपींची पोलिस कोठडी काल संपली, त्यानंतर, सीबीआयतर्फे आरोपींच्या पोलिस कोठडीत वाढ करण्याची मागणी न्यायालयानं मान्य केली.

**<u>पुणे झिका</u>**

पुणे शहरात झिका विषाणूचा प्रादुर्भाव वाढत असून आत्तापर्यंत 6 रुग्णांना संसर्ग झाल्याचं आढळून आलं आहे. पुण्यातील दोन गर्भवती महिलांना झिका विषाणूची लागण झाल्याचं तपासणी अहवालात दिसून आलं. या दोन्ही महिलांची प्रकृती स्थिर आहे. रोगनिदान झालेल्या रुग्णांनी देशात किंवा परदेशात प्रवास केलेला नसल्याची माहिती पुणे

महापालिकेच्या आरोग्य विभागानं दिली आहे. झिका संसर्गाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महापालिकेनं पाणी साठलेल्या 25 आस्थापनांना नोटीसा बजावल्या आहेत.

**<u>हाथरस</u>**

उत्तर प्रदेशातल्या हाथरस जिल्ह्यातील एका गावात सत्संगादरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत 116 जणांचा मृत्यू झाला असून अनेकजण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये अनेक महिला आणि मुलांचा समावेश आहे. सत्संगाला मोठ्या प्रमाणावर गर्दी झाल्यामुळे ही चेंगराचेंगरी झाल्याचं वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितलं. राष्ट्रपती, पंतप्रधान आणि उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी 2 लाख रुपये, तर जखमींना 50 हजार रुपयांच्या मदतीची घोषणा पंतप्रधानांनी केली आहे.

**<u>अपघात</u>**

पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर काल झालेल्या भीषण अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला, तर एक जण गंभीर झाला आहे. गाडीचं टायर फुटल्यामुळं गाडी रस्त्यावर घासत जाऊन सिमेंटच्या खांबाला जोरात धडकल्यानं हा अपघात झाला.

**<u>हवामान</u>**

कोकण आणि मध्य महाराष्ट्राच्या घाट माथ्यावर मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. विदर्भात हाच इशारा जोराचे वारे आणि वीजांसह देण्यात आला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.